# मराठीच्या अभिमानगीताची निर्मिती - लाभले अम्हांस भाग्य बोलतो मराठी



प्रिय मराठीप्रेमी मित्रांनो,

कौशल इनामदार या तरुण व उभरत्या अशा आपल्या संगीतकार-मित्राने आपल्या मराठी भाषेला एक अभिमानगीत देण्याचा संकल्प सोडला आहे. त्यासाठी त्याने मराठीतील श्रेष्ठ कवी सुरेश भटांची 'लाभले अम्हांस भाग्य' ही अत्युत्तम, मराठी माणसाच्या स्वभाषा व स्वसंस्कृती बद्दलच्या भावना अचूकपणे मांडणारी, आपल्या सर्वांची आवडती व वाचताना आपल्याला मराठीच्या अभिमानाने बेभान करणारी कविता त्यांनी निवडली आहे. या कवितेला उत्तम संगीताचा साज लेववून तिला मराठी अभिमानगीत म्हणून जगापुढे सादर करण्याचा कौशलचा मनोदय आहे.

हा प्रकल्प म्हणजे मराठी माणसांचे औदासिन्य व मरगळ झटकून टाकण्यासाठी स्वभाषा व स्वसंस्कृतीबद्दल वाटणाऱ्या स्वाभिमानाचे एक इंजेक्शन ठरावे. मराठीला ह्या उपक्रमाला आपल्यापैकी प्रत्येकाने हातभार लावावाच; शिवाय आपल्या ओळखीच्या जास्तीतजास्त मराठीप्रेमी मित्रबांधवांपर्यंत हा संदेश पोचविण्याचा प्रयत्न करावा.

खरं म्हणजे, कौशल इनामदारांना उत्तमोत्तम साधने, संगीत-तज्ज्ञ, १००च्या वर वादक व ३५०च्या वर गायक घेऊन जागतिक पातळीवरील भव्य पद्धतीने, या गाण्याच्या हा भव्य-दिव्य उपक्रम पूर्ण करण्यास एखादा प्रायोजक सहज मिळाला असता. पण हा सर्वसामान्य मराठी जनतेचा स्वतःचा उपक्रम असे त्याला स्वरूप देण्यासाठी त्याने २००० मराठीप्रेमींकडून प्रत्येकी रू० ५०० जमवायचे ठरवले. आतापर्यंत या उपक्रमाला हातभार लावणाऱ्यांत महाराष्ट्राला आपले घर मानणाऱ्या अनेक मूळच्या परप्रांतीयांचाही समावेश आहे.

पाचशे रुपये ही रक्कम आज आपण एका वेळी पिझ्झा किंवा चायनीज खाद्यपदार्थांसाठी किंवा इतर हॉटेलिंगसाठी, मल्टीप्लेक्स चित्रपटगृहात सहकुटुंब एखादा चित्रपट पाहण्यासाठी व अशा इतर कारणांसाठी फारसा विचार न करता सहज खर्च करतो. मग अशा या मायबोलीच्या संबंधातील महत्वाच्या, पवित्र कार्यासाठी एवढी रक्कम खर्च करणे आपल्याला मुळीच जड जाऊ नये.

आपल्यापैकी बऱ्याच जणांनी मदतीचा हात पुढे केलेला असेलच. ज्यांना इच्छा असूनही तसे करण्यास कामातून सवड मिळाली नसेल त्यांनी अजुनही आपली मदत या उपक्रमाला अवश्य पाठवावी. ती रक्कम आपल्याला फार मोठी नसली तरी त्यामागील भावनांचे मूल्य फार मोठे असणार आहे. मातृभाषेचे ऋण हे मातृभूमीच्या ऋणांप्रमाणेच पवित्र असतात व आपण त्यातून कधीही पूर्णपणे उतराई होऊ शकत नाही. पण तरीही मातेबद्दलच्या आपल्या प्रेमाचे व कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून आपण अशा प्रकारच्या उपक्रमांना अवश्य हातभार लावावा.

धनादेश 'मराठी अस्मिता' (Marathi Asmita) या नावाने काढून मराठी अस्मिता, द्वारा: कौशल श्रीकृष्ण इनामदार, १०२, त्रिवेणी, शुचिधाम, फिल्म सिटी मार्ग, दिंडोशी बस आगाराजवळ, गोरेगांव (पू), मुंबई - ४०० ०६३, महाराष्ट्र, भारत, या पत्त्यावर पाठवावेत. कृपया धनादेशासोबत आपलं नांव, पत्ता, दूरध्वनी क्र., आणि ई-मेल ही माहिती पाठवावी. परदेशी राहणाऱ्या बांधवांना पेपॅलने अथवा क्रेडिट कार्डने $२० (टपालखर्च समाविष्ट) देऊन सहभागी होता येईल.

धनादेश आपण परस्पर कौशल यांच्या पत्त्यावर पाठवावा. याविषयी कुठल्याही प्रकारची शंका किंवा अडचण असल्यास तसे amrutayatri@gmail.com या ई-मेल पत्त्यावर कळवावे म्हणजे आम्ही आपल्याला सहाय्य करण्याचा प्रयत्न करू.

आपल्या भावना व मते या लेखाखालील रकान्यात अवश्य नमूद करावीत. आम्हाला उत्तर न देता येण्यासारखी काही महत्त्वाची, विशेष शंका असेल तर तिचे उत्तर आपण स्वतः कौशल इनामदारांकडून आपण घेऊ.

***- अमृतयात्री***

http://amrutmanthan.wordpress.com/

→

लोकसत्ता, ९ डिसेंबर २००९

## एफ.एम. वाहिन्यांचा सकारात्मक निषेध

## ठाण्यामध्ये निनादणार मराठी अभिमान गीताचा समूह सूर!

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत श्रोत्यांचे अहोरात्र मनोरंजन करीत असलेल्या खासगी एफएम वाहिन्यांनी मराठी गाणी अजिबात न लावण्याचे धोरण अवलंबिले असून, त्याचा सकारात्मक पद्धतीने निषेध करण्यासाठी अतिशय भव्य स्वरूपात ध्वनिमुद्रित करण्यात येत असलेले मराठीचे अभिमान गीत महाराष्ट्राची सांस्कृतिक उपराजधानी असणाऱ्या ठाण्यात मराठी दिनी - २७ फेब्रुवारीला एका जाहीर कार्यक्रमात सर्वप्रथम ऐकविले जाणार आहे. या गीताचे संगीतकार कौशल इनामदार यांनी रविवारी ठाण्यात 'इंद्रधनु'च्या रंगोत्सवात ही घोषणा केली.

मराठी गाणी ऐकली की डाऊन मार्केट फिल येतो, असा एक अजब जावईशोध या वाहिन्यांचे विपणन करणाऱ्या अधिकाऱ्यांनी लावला आहे. त्यातूनच हिंदीच्या जोडीला तामिळ, तेलगू, कन्नड, भोजपुरी आणि पंजाबी अशी सर्व गाणी एफएमवरून ऐकवली जातात, पण त्यात मराठी गाणे औषधालाही नसते. गाणी जुनी असोत वा नवी ती लोकप्रिय होण्यासाठी, सतत रसिकांच्या ओठावर राहण्यासाठी सातत्याने वाजत राहणे आवश्यक असते. त्यासाठी रेडिओ हे फार मोठे माध्यम आहे. मराठीतील अनेक अजरामर गाणी आधी रेकॉर्डवरून प्रसारित झाली आणि त्यानंतर त्याच्या रेकॉर्डस्, कॅसेट्स किंवा सीडी निघाल्या. खासगी एफएम वाहिन्यांमुळे कमालीची विविधता असणाऱ्या मराठी गीत-संगीत विश्वात एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा होती. मात्र या वाहिन्यांची विपणन यंत्रणा सांभाळणाऱ्या बहुतेक अमराठी अधिकाऱ्यांनी मुंबईच्या कॉस्मोपॉलिट चेहऱ्याकडे बोट दाखवित महाराष्ट्राच्या राजधानीत इतर सर्व भाषांना जवळ करीत, मराठीला मात्र कटाक्षाने दूर ठेवले आहे.

यासंदर्भात संगीतकार कौशल इनामदार यांनी 'वृत्तान्त'शी बोलताना कोणत्याही भाषेमुळे डाऊन मार्केट फिल कसा काय येऊ शकतो, असा सवाल उपस्थित केला आहे. जगभरात पाच हजाराहून अधिक भाषा बोलल्या जातात. त्यात वर्ल्ड बुक एन्सायक्लोपेडीया केलेल्या सर्वेक्षणानुसार सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा क्रमांक १७वा लागतो. विकीपीडियाने तर जागतिक क्रमवारीत मराठीला १५वे स्थान दिले आहे. 'नासा'ने अंतराळातील अज्ञात परग्रहवासीयांसाठी पृथ्वीवासीयांचा संदेश ५१ भाषांमध्ये ध्वनिमुद्रित करून पाठविला असून, त्यातही मराठीचा समावेश आहे. मुंबईप्रमाणे भारतातल्या इतर महानगरांमध्येही विविध कंपन्यांनी एफएम वाहिन्या सुरू केल्या आहेत. त्या-त्या शहरात प्रादेशिक भाषांमधील गाणी प्राधान्याने वाजवली जातात. फक्त मुंबईतच मराठी गाणी न लावण्याचे धोरण आहे.

कोणतीही तोडफोड अथवा आदळआपट न करता एका चळवळीच्या माध्यमातून या अन्यायकारक धोरणाचा निषेध करण्यासाठी एक भव्य अभिमान गीत तयार करण्याचा निर्धार कौशल इनामदार यांनी केला आणि त्याला मुंबईच्या संगीत वर्तुळातील सर्व दिग्गजांची साथ लाभली. सुरेश भट यांचे 'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी' हे गाणे शंभरहून अधिक मान्यवर गायकांनी गायले असून, त्याला ३५० गायकांनी साथ दिली आहे. नव्वदीतले शाहीर विठ्ठल उमप ते वयाची अद्याप दशकपूर्तीही न झालेली मुग्धा वैशंपायनपर्यंत विविध वयोगटातील गायकांनी या गाण्यासाठी आपला सूर दिला आहे. त्यात शंकर महादेवन, महालक्ष्मी अय्यर, रवींद्र साठे, सुरेश वाडकर, आरती अंकलीकर, पं. सत्यशील देशपांडे, साधना सरगम, श्रीधर फडके, स्वप्नील बांदोडकर, बेला शेंडे आदींचा समावेश आहे.

या गाण्याचे चळवळीचे स्वरूप टिकून रहावे म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाकडून अथवा कॉर्पोरेट विश्वातून जाहिराती घेण्यात आलेल्या नाहीत. दोन हजार नागरिकांनी प्रत्येकी ५०० रुपये देऊन या अभिमान गीतात आपला सहभाग नोंदविला आहे. ५०० रुपये भरणाऱ्याला या गाण्याची सीडी घरपोच दिली जाणार आहे.

→



## लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी (कवि सुरेश भट)

१. लाभले अम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

२. आमुच्या मनामनात दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी
आमुच्या नसानसात नाचते मराठी

३. आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यात रांगते मराठी
आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरात वाढते मराठी

४. आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलात हासते मराठी
येथल्या दिशादिशात दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

५. येथल्या दरीदरीत हिंडते मराठी
येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरुलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी

६. येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चराचरात राहते मराठी

७. पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी
आपुल्या घरात हाल सोसते मराठी
हे असे कितीक 'खेळ' पाहते मराठी
शेवटी मदांध तख्त फोडते मराठी